**L. A. BILL No. III OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SETTLEMENT OF ARREARS OF TAX, INTEREST, PENALTY OR LATE FEE ACT, 2025.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३.**

**महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०२५ चा महा. १७.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

एचबी ३०५७–१ (१०४५—२-२०२६)

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम १० ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम,२०२५ (यात यापुढे, ज्याचा निर्देश, “मुख्य अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम १० मध्ये, तक्त्यातील, स्तंभ (४) मधील, “३१ डिसेंबर २०२५” या मजकुराऐवजी “३१ मार्च २०२६”, हा मजकूर दाखल करण्यात येईल. २०२५ चा महा. १७.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ११ ची सुधारणा. **३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

“ परंतु, जेव्हा एकाच वैधानिक आदेशाच्या बाबतीत एकापेक्षा अधिक अपिले दाखल केले असतील आणि अशा अपिलांमध्ये विभिन्न व विलग करता येण्याजोगे विवाद मुद्दे अंतर्भूत असतील त्या बाबतीत, अर्जदारास, या अधिनियमाअन्वये लाभ मिळविण्याच्या प्रयोजनासाठी, अशा विभिन्न व विलग करता येण्यायोग्य विवाद मुद्यांशी संबंधित असणारे अपील, उर्वरित अपिलाच्या किंवा अपिलांच्या सातत्यतेवर परिणाम न करता, पूर्णपणे व विनाशर्त मागे घेता येईल :

परंतु आणखी असे की, जेव्हा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, वैधानिक आदेशाच्या बाबतीत, मग तो अपिलातील असो किंवा अन्यथा असो,- कोणत्याही आवश्यक रकमेचे प्रदान करण्यात आले असेल आणि,—

(क) जेव्हा, असे प्रदान, विवाद मुद्दे-निहाय ओळखण्यायोग्य असेल तर, ते संबंधित विवाद मुद्याशी किंवा मुद्यांशी संबंधित असणाऱ्या दायित्वापोटी समायोजित करण्यात येईल;

(ख) जेव्हा, असे प्रदान, विवाद मुद्दे-निहाय ओळखण्यायोग्य नसेल तर, ते, पदनिर्देशित अधिकारी निर्धारित करील अशा रीतीने, या कलमाअन्वये मागे घेतलेल्या अपिलामधून किंवा अपिलांमधून आणि ज्या प्रलंबित राहिलेल्या आहेत अशा अपिलामधून किंवा अपीलांमधून उद्‌भवणाऱ्या दायित्वाच्या पोटी, प्रमाणशीरपणे समायोजित करण्यात येईल.”.

विधिग्राह्यीकरण. **४.** महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, “ उक्त अधिनियम ” असा केला आहे) यात अथवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ३१ डिसेंबर २०२५ नंतर, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापर्यंत, कोणत्याही अर्जदाराकडून उक्त अधिनियमान्वये प्रदान केलेल्या किंवा गोळा केलेल्या उक्त अधिनियमान्वये व्याख्या केल्याप्रमाणे संबद्ध अधिनियमान्वये कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या आवश्यक रकमेचे कोणतेही प्रदान हे, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही सर्व महत्त्वाच्या वेळी सतत अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार यथोचितरीत्या व वैधरीत्या प्रदान करण्यात व गोळा करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि नेहमीकरिता प्रदान करण्यात व गोळा करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार,— २०२५ चा महा. १७. २०२६ चा महा.....

(क) आवश्यक रकमेच्या मार्गाने मिळालेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणात अथवा कोणत्याही न्यायालयासमोर किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही ;

(ख) कोणतेही न्यायालय किंवा इतर कोणतेही प्राधिकरण, अशा आवश्यक रकमेच्या मार्गाने मिळालेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश, बजावणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) या व्यतिरिक्त अन्य केंद्रीय अधिनियमांन्वये किंवा राज्य अधिनियमांन्वये नोंदणी केलेल्या अथवा शासन निर्णयांद्वारे घटित केलेल्या महामंडळांकडून, सार्वजनिक क्षेत्रातील बँकाकडून, विभागांकडून, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून किंवा प्राधिकरणांकडून, उपक्रमांकडून किंवा संस्थाकडून प्रदेय असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या विविध अधिनियमांन्वये आकारण्यात आलेल्या, लादण्यात आलेल्या किंवा प्रदेय असलेल्या, कराच्या, व्याजाच्या, शास्तीच्या किंवा विलंब शुल्काच्या थकबाकींची तडजोड करण्यासाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ (२०२५ चा महा. १७) अधिनियमित करण्यात आला आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम १० मध्ये संबद्ध अधिनियमान्वये कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या आवश्यक रकमेचे प्रदान करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ या अंतिम दिनांकाची तरतूद केली आहे. तथापि, असे आढळून आले आहे की, अनेक पात्र सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम व शासकीय संस्था, जरी तडजोडीचा लाभ घेण्यासाठी इच्छुक असल्या तरी, त्या, विविध अपील पीठांमध्ये अपिले प्रलंबित असल्यामुळे, विनिर्दिष्ट कालमर्यादेत अपिले मागे घेण्याची आणि आवश्यक रक्कम प्रदान करण्याची प्रक्रिया पूर्ण करू शकलेल्या नाहीत. प्रदानाचा उक्त अंतिम दिनांक पुढे वाढविण्यासाठी अशा संस्थांकडून राज्य शासनास, अनेक निवेदने प्राप्त झालेली आहेत. म्हणून, उक्त दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढविणे इष्ट आहे असे शासनास, वाटते. म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १० मध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** असे निदर्शनास आले आहे की, विवक्षित प्रकरणांमध्ये, एका वैधानिक आदेशामध्ये विभिन्न व विलग करता येण्याजोगे एकापेक्षा अधिक विवाद मुद्दे अंतर्भूत आहेत आणि अशा, विवाद मुद्यांच्या बाबतीत स्वतंत्र अपिले प्रलंबित आहेत. उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या विद्यमान तरतुदीनुसार, तडजोडीची शर्त म्हणून अपील मागे घेणे आवश्यक आहे. या तरतुदीमुळे, अपीलकर्त्याचा, अपीलामध्ये असलेल्या काही विभिन्न व विलग करता येण्यायोग्य विवाद मुद्यांची तडजोड करण्याचा इरादा असला तरी देखील, त्याला पूर्णपणे अपील मागे घ्यावे लागते. म्हणून, अपिलातील उर्वरित मुद्यांच्या सातत्यावर परिणाम न करता, अपिलामधील अशा विभिन्न व विलग करता येण्यायोग्य ज्या विवाद मुद्यांच्या बाबतीत अपीलकर्त्याचा तडजोड करण्याचा इरादा आहे त्या विवाद मुद्द्यांच्या बाबतीतच केवळ अपील मागे घेण्याची परवानगी देण्यासाठी आणि प्रदानांचे प्रमाणशीर समायोजन करण्याची तरतूद करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ११ मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २३ फेब्रुवारी २०२६.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

## वित्तीय ज्ञापन

आवश्यक रकमेचे प्रदान करण्याचा अंतिम दिनांक वाढविण्याकरिता व केवळ विभिन्न व विलग करता येण्यायोग्य विवाद मुद्याच्या बाबतीत अपील मागे घेण्याची परवानगी देण्याकरिता अधिनियमाच्या कलमे १० व ११ यांमध्ये सुधारणा करण्याकरिता हे विधेयक प्रस्तावित केले आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल, अशी कोणतीही तरतूद या विधेयकात नाही.

(शा.म.मु.) एचबी ३०५७–३ (१०४५–२-२०२६)

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेत शिफारस करीत आहेत.

**सन २०२६ चे वि.स.वि.क्र. ३— महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६**

**[महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यातील उतारे]**

**(२०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.)**

**१. ते ९.** *** *** *** ***

आवश्यक रकमेचे प्रदान करण्याचा कालावधी.

**१०.** या अधिनियमान्वये आवश्यक रकमेचे प्रदान करण्याचा कालावधी, खालील तक्त्यामध्ये दिल्याप्रमाणे असेल :—

तक्ता

| अ. क्र. | तपशील | प्रारंभाचा दिनांक | शेवटचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | अर्जदाराने ज्या कालावधीत आवश्यक रक्कम प्रदान करावयाची आहे तो कालावधी | याअधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक | ३१ डिसेंबर २०२५. |

तडजोडीच्या शर्ती.

**११.** (१) संबंद्ध अधिनियमाच्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, संबद्ध अधिनियमान्वये अपील प्राधिकाऱ्यासमोर किंवा न्यायाधिकरणासमोर किंवा न्यायालयासमोर प्रलंबित असलेले अपील, कोणतेही असल्यास, अर्जदाराकडून पूर्णपणे व विनाशर्त मागे घेण्यात येईल.

(२) व (३) *** *** *** ***

**१२. ते २०.** *** *** *** ***

जोडपत्र - क *** *** *** ***

जोडपत्र - ख *** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३.]**

**[महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकी तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.